केसरी

बुधवार दि. १७ नोव्हेंबर २००४ पुणे C (शहर आवृत्ति)



# होमिओपॅथीला लोकप्रिय बनवणारे डॉक्टर



'होमिओपॅथीला लोकप्रिय बनविणारे डॉक्टर' असा लौकिक मिळविलेले डॉक्टर अमर दत्तात्रय निकम यांना नुकतेच 'इंदिरा गांधी सद्‌भावना पारितोषिका'ने गौरविण्यांत आले असून, सदर पारितोषिक कै. इंदिरा गांधी यांच्या स्मृत्यर्थ दि. १८ नोव्हेंबर रोजी हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिसंवादाच्या प्रसंगी डॉ. निकम यांना सन्मानपूर्वक देण्यात येणार आहे. या राष्ट्रीत स्तरावरील परिसवादाचा विषय 'कै. श्रीमती इंदिरा यांचे जीवन व कार्य' असा असून, दिल्ली येथील 'ग्लोबल एकॉनॉमिक कौन्सिल' या संस्थेतर्फे तो आयोजित केलेला आहे.

डॉ. अमर निकम हे मूळचे पुण्याचेच! पुणे येथील विमलाबाई गरवारे हायस्कूलचे माजी विद्यार्थी! हुशार व क्रीडाक्षेत्रात प्रावीण्य मिळविलेले गुणवंत विद्यार्थी! सदा हसतमुखत असणारे व भरदार उंचपुऱ्या शरीर यष्टीमुळे सर्वांचे लक्ष चटकन वेधून घेणारे व्यक्तिमत्व त्यांना लाभले आहे. खामगाव येथील 'पंचशील होमिओपॅथिक कॉलेज'मधून 'डी. एच. एम. एस.' ही पदवी प्राप्त करून त्यांनी वैद्यकीय व्यवसायात चोवीस वर्षांपूर्वी प्रवेश केला आणि पुणे येथील लोकमान्य रुग्णालयाच्या होमिओपॅथी विभागात वैद्यकीय सेवेला सुरुवात केली. पुढील काही वर्षांत बीड, खोपोली, चाकण, काटे-पिंपळे इत्यादी ठिकाणी होमिओपॅथी उपचार पद्धतीने सेवा करीत पुण्याजवळील पिंप्री गावामध्ये 'आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल अँड हिलिंग सेंटर' या नावाने पन्नास खाटांचे भव्य रुग्णालय त्यांनी उभे केले.

या रुग्णालयाचे वेगळेपण अनेक दृष्टीनी उल्लेखनीय आहे. 'इंजेक्शन' व 'सलाईन' नसलेले रुग्णालय असे त्याचे वैशिष्ट्य आता सर्वश्रुत झाले आहे. रुग्णाची रोगचिकित्सा सखोल व सूक्ष्मपणे करता यावी, म्हणून येथे रुग्णासमोर 'व्हिडिओ शूटिंग'ची व्यवस्था केली जाते व डॉ. निकम त्या वातावरणात रोग चिकित्सेला उपयुक्त असे प्रश्न विचारून चिकित्सक नोंदी करतात. या रुग्णालयाच्या प्रत्येक दालनात चोवीस तास व्हिडिओ कॅमेरे रुग्णांचे चित्रण करीत असतात. हेतू हा- की प्रसंगी रुग्णाचा आजार गंभीर होत असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यावर तातडीने उपचार करता यावेत. प्रत्येक दिवशी वीस ते पंचवीस शिकाऊ डॉक्टरांची तुकडी येथे डॉ. निकम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेण्यासाठी येत असते. होमिओपाथी शास्त्राचे सेवांतर्गत शिक्षण घेण्यासाठीं अनेक विद्यार्थी या रुग्णालयात येत असतात. पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत बाह्य रुग्णाविभाग रुग्णांनी गजबजलेला असतो आणि डॉ. अमर निकम तर सकाळपासून उत्तररात्र टळेपर्यंत अखंडपणे रुग्णतपाणसी व रुग्णोपचार करीत असतात. एवढे प्रचंड कष्ट करूनही डॉ. निकम नित्य आनंदी व उत्साही दिसतात. या उत्साहाचे रहस्य व्यक्त करताना डॉ. निकम सुहास्य वदनाने म्हणतात, 'रात्री जागे राहून काम करण्याचे विलक्षण सामर्थ्य माझ्या अंगी आणतात ते माझेच हे रुग्ण!'

आपल्याच 'आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल' पुरती ही रुग्णसेवा, रुग्णोपचार व होमिओपॅथीचे ज्ञान डॉक्टर निकमांनी मर्यादित ठेवलेले नाही. मुंबई, कोल्हापूर, अहमदनगर, पुणे (भारती विद्यापीठ व धोंडूमामा साठे वैद्यकीय महाविद्यालय) इत्यादी विविध संस्थांत ते आपल्या विषयाच्या अध्यापनासाठी जात असतात. पण समाजातील गरजू व गरीब रुग्णांची सेवा करता यांना म्हणून पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, नाशिक (कुंभमेळा), कोल्हापूर (गगनबावडा), गणपतिपुळे, अमरनाथ इत्यादी तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या वारकऱ्यांवर मोफत औषधोपचार करण्यासाठी ते भ्रमंती करीत असतात. 'रुग्णसेवा हाच ध्यास, रुग्णसेवा हाच श्वास' अशा भारलेल्या अवस्थेत हा धन्वंतरी रात्रंदिवस धावपळ करीत असतो. समाजासाठी समर्पित केलेले आयुष्य जगत असतो. खेळाडूंच्या आरोग्य स्वास्थ्यासाठी धडपडत असतो.

डॉ. निकम यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्याची दखल विविध मान्यवर संस्थांनी आतापर्यंत घेतली आहे. १९९१ मध्ये ऑस्ट्रेलियामधील ब्रिस्बेन येथे झालेल्या अपंगांच्या क्रीडास्पर्धांसाठी 'इंडियन टीम डॉक्टर' म्हणून डॉ. निकम यांची निवड झाली होती. भारतातील रोगचिकित्सेतील अनुभव सांगण्यासाठी लंडन येथील 'सोसायटी ऑफ होमिओपॅथी' या संस्थेने डॉ. निकम यांना निमंत्रित केले होते. युरोपमधील होमिओपॅथी उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या एका तुकडीने डॉ. निकम यांच्या पिंप्री येथील हॉस्पिटलला सन २००१ मध्ये भेट दिली होती व क्लासिकल होमिओपॅथीचा उपचार डॉ. निकम अत्यंत यशस्वीपणे करीत असल्याचे पाहून समाधान व्यक्त केले होते. सन २००४ च्या मे महिन्यात संयुक्त अरब राष्ट्रसंघातील डॉ. अराफत यांनी डॉ. निकम यांना दुबई भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यांच्याशी होमिओपॅथिक उपचारांसंबंधी विचार विनिमय केला होता.

गरीब-गरजू रुग्णांचे धन्वंतरी, अशी प्रतिमा डॉक्टर निकमांची आजच्या समाजापुढे साकार होत आहे. 'असांध्य रोगावर उपचार करणारे डॉक्टर' असा त्यांचा लौकीक सर्वत्र होत आहे. दि. १८ नोव्हेंबर रोजी त्यांना देण्यात येणाऱ्या इंदिरा गांधी सद्‌भावना पारितोषिकामुळे समाजामधील डॉ. निकम यांच्याबद्दलच्या सद्‌भावना अधिकच विस्तृत होतील. त्याच सद्‌भावनेने केलेले डॉ. निकम यांचे हे अभिनंदन!

**डॉ. प्र. ल. गावडे**